आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!



चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत

जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची

दैनिक स्वराज्यदूत

आपल्या पाठीशी आहे

आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी

छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय

स्वराज्यदूत NEWS

वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com



मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-62 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 09 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६२ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. ०९ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## भाजपा आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची दुचाकीला धडक, एक जण जागीच ठार

दिपक रोकडे
बीड प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस यांच्या मुलाच्या कारने एका दुचाकीला धडक दिली असून या अपघातात दुचाकीस्वार नितीन शेळके हे जागीच ठार झाले आहेत. सोमवारी (७ जुलै) रात्री १०.३० ते ११ च्या सुमारास हा अपघात झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. सागर सुरेश धस हे आष्टी येथून पुण्याला जात असताना सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्यांच्या कारने नितीन शेळके यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. या अपघातात शेळके यांच्या मृत्यू झाला असून सुपा पोलीस या अपघात प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

सागर धस हे सोमवारी रात्री आष्टीवरून पुण्याला जात होते. यावेळी सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कामरगाव परिसरात त्यांच्या कारने एका दुचाकीला मागून धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार नितीन शेळके यांचा जागीच मृत्यू झाला आहे. सुपा पोलीस या अपघात प्रकरणाचा तपास करत आहेत. तसेच याप्रकरणी गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया चालू आहे. या अपघातात दोन्ही गाड्यांचं नुकसान झालं आहे.

दरम्यान, आमदार पुत्राच्या भरधाव कारने दुचाकीस्वाराला उडवल्याची बातमी आष्टीसह संपूर्ण बीड जिल्ह्यात पसरली असून यावरून सागर धस व आमदार सुरेश धस यांच्याविरोधात संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता या अपघातप्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## रघुवीर घाटात सतत दरडी कोसळू लागल्याने महामार्ग बनला धोकादायक, रत्नागिरी व सातारा जिल्ह्यांचा एकमेकांसोबत संपर्क तुटण्याची भीती

राजेश यादव
सातारा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



सह्याद्रीच्या कुशीत सुमारे ४ हजार फूट उंचीवर वसलेल्या अन् तितक्याच नागमोडी वळणाचा असलेला सह्याद्रीच्या कडेकपारीतून थेट पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात जाणाऱ्या रघुवीर घाटाची अवस्था बिकटच झाली आहे. या घाटात सद्यस्थितीत दरडी कोसळण्याचे सत्र सुरूच असल्याने हा घाट प्रवासासाठी धोकादायक बनला आहे.

पावसाळ्यात सतत दरडी कोसळत असल्याने रत्नागिरी सातारा मार्गावरील दरडीचा घाट म्हणून गेल्या काही वर्षांत या घाटाने आपली ओळख निर्माण केली आहे. कोरीव सह्याद्रीचा कातळ फोडून त्यातून २ जिल्ह्यांच्या सीमा एकत्र जोडण्याचा प्रशासनाने केलेला भरीव प्रयत्न उल्लेखनीय आहे. परंतु या घाटाच्या निर्मितीनंतर घाटामध्ये पावसाळी कालावधीत निर्माण होणारी नैसर्गिक आपत्ती ही या घाटाचे मुख्य दुखणे बनली आहे.

खेड तालुक्यापासून सुमारे २२ किमी अंतरावर असलेल्या रघुवीर घाटाला पावसाळ्यामध्ये पर्यटकांची चांगलीच पसंती असते. सुमारे ३ महिने पावसाची विविध रुपे या घाटात पर्यटकांची मने मोहून टाकणारी असतात. त्यामुळे या घाटात पर्यटकांची जणू काही मांदीयाळीच पहावयास मिळते.

सातारा व रत्नागिरी जिल्ह्याच्या हद्दीवर सह्याद्रीच्या पर्वत रांगांमधून जाणारा रघुवीर घाट कोकणातील आता प्रमुख पर्यटन केंद्र बनण्याच्या प्रयत्नात आहे. कोयना धरणाच्या बांधकामानंतर खांदाटी खोरे म्हणून संबोधले गेलेल्या या भागातील शिंदी, कळवण, आरव, मोरणी, उचाट, याधीवळे, लामन, निवळी, अकल्पे, गाठीवली आदी गावांचा सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्याशी असलेला संपर्क जलाशयामुळे तुटला होता. १९९०-९१ पर्यंत येथील स्थानिक ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागला होता. अखेर राज्य शासनाने रत्नागिरी व सातारा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या या खोऱ्यातील नागरिकांना मानवी वस्तीशी जोडण्यासाठी १९९०-९१ मध्ये खेड तालुक्यातील खोपी या गावातून या घाटाचे काम सुरु केले.

सह्याद्रीची अवघड पर्वतरांगा पार करून तसेच अनेक नैसर्गिक आपत्तीचा सामना करत अवघड असलेला हा घाट २००२ मध्ये पूर्णत्वास नेण्यास प्रशासनाला यश आले. घाटाचे काम पूर्ण झाल्यावर खांदाटी खोऱ्यातील रहिवाशांचा थेट खेड तालुक्याशी संपर्क प्रस्थापित झाला. या मार्गावर खेड- उचाट- अकल्पे ही बस देखील प्रथमच २००२ मध्ये धावल्याने देखील ग्रामस्थांचा दळण वळणचा प्रश्न निकाली निघाला.

रघुवीर घाट १० किमी अंतराचा असून या मार्गावरील ठिकाणे अत्यंत धोक्याची तसेच दरडी कोसळण्याची शक्यता असल्याने हा घाट सध्या तरी पावसाळा कालावधीत धोक्याचा भाग बनला आहे. समुद्र सपाटीपासून हा घाट ४ हजार फुटांपेक्षा उंच असल्यामुळे या ठिकाणी पावसाचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात असल्याने नैसर्गिक आपत्तीचा सामना दरवर्षी या घाटाला करावा लागतो. डोंगर माथ्यांवरून घरंगळत खाली येणारा दगड मातीचा भराव तसेच मोठ मोठे खडक या रस्त्यावरती येत असल्याने पावसाळा कालावधीत हा घाट वाहतुकीसाठी पूर्णतः बंदच होत असल्याने येथील ग्रामस्थांचा शहराशी असलेला संपर्क तुटतो. खोपी-शिरगावच्या डोंगर माथ्यावरील हा घाट पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा आहे. त्यामुळे भौगोलिक दृष्टीने असलेल्या या घाटातील अनेक समस्या आजही 'जैसे थे' च आहे. रस्ते उखडलेल्या अवस्थेत असून रेलीगची देखील मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली आहे. या घाटामध्ये अनेक प्रकारच्या वनस्पती शिवाय पावसाळ्यात दिसणारे लाल दुर्मिळ खेकडे, धबधबे असे निसर्गाची संपूर्ण ठेव असलेला हा घाट सध्याच्या घडीला दुर्लक्षीत झाला आहे. दरवर्षी डागडुजीच्या नावाखाली सत्याचे डांबरीकरण केले जाते. मात्र पावसाळ्यात ते कोसळणाऱ्या दरडीमुळे वाहून जाते. अशी विदारक स्थिती या घाटाचे झाली आहे.


महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## सुरक्षा कायद्यासाठी नाशकात वकिलांचे आंदोलन

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

---------------------------



राज्यात वकिलांवर हल्ले होण्याचे प्रमाण वाढत असल्याने डॉक्टरांच्या धर्तीवर वकिलांच्या संरक्षणार्थ तातडीने वकील सुरक्षा कायदा मंजूर करावा, या मागणीसाठी मंगळवारी नाशिक वकील संघाच्या नेतृत्वाखाली जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन करण्यात आले. संघाचे सभासद रामेश्वर बोराडे यांच्यावर अलीकडेच प्राणघातक हल्ला झाल्याने समाजात वकील सुरक्षित नसल्याचे हे द्योतक असल्याकडे आंदोलकांनी लक्ष वेधले.

जिल्हा न्यायालयात वकिली करणारे बोराडे यांच्यावर काही दिवसांपूर्वी सात ते आठ जणांनी शस्त्रांनी हल्ला चढविला होता. त्यात ते गंभीर जखमी झाले. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून या गुन्ह्याचा योग्यरितीने तपास होऊन हा खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात यावा, अशी मागणी वकील संघाने केली आहे. हल्ल्याच्या निषेधार्थ संघाने आधी निषेध फेरी काढली होती. मंगळवारी वकील संघाचे अध्यक्ष नितीन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. वकिलांवरील प्राणघातक हल्ल्यांचा विचार करता राज्यात तातडीने वकील सुरक्षा कायद्याची अंमलबजावणीची गरज आंदोलकांनी मांडली. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व__ गोवा आणि राज्यातील जिल्हा व तालुकास्तरीय वकील संघांनी पाठपुरावा करूनही हा कायदा मंजूर झालेला नाही. वकील समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी झगडत असताना राज्य सरकार वकील सुरक्षा कायदा मंजूर न करता त्यांच्यावर अन्याय करीत असल्याची तक्रार आंदोलकांनी केली. हा कायदा लवकर मंजूर न झाल्यास राज्यातील वकिलांना मोर्चे व उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे

> राज्यात वकिलांवर भ्याड हल्ले सुरू आहेत. वकिलांना कुठलेही संरक्षण नाही. डॉक्टरांसाठी जसा कायदा आहे, तसा वकिली संरक्षण कायदा केंद्र व राज्याने मंजूर करावा. न्यायदानात वकिलांचा सहभाग महत्वाचा असतो. त्यामुळे विरोधी पक्षाच्या मतांचाही आदर राखला पाहिजे. भ्याड हल्ल्याने प्रश्न सुटत नाहीत. गुंडाराज येण्याऐवजी कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी वकील सुरक्षा कायदा मंजूर होण्याची गरज आहे.
>
> **ॲड. नितीन ठाकरे**
> **(अध्यक्ष, नाशिक वकील संघ)**


शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# कुपोषणाचा विळखा

कोणत्याही समस्येकडे कानाडोळा केला, तर त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. जोपर्यंत समस्येचा आपणास त्रास जाणवत नाही, समस्या आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत येत नाही, समस्येमुळे आपली व्यक्तिगत हानी होत नाही, तोपर्यंत आपण जागे होत नाही. समस्या निवारणासाठी प्रयत्न केले जातात.

समस्येच्या गांभीर्याबाबत टाहो फोडला जातो. हीच आजवर आपल्या देशातील प्रत्येकाची मानसिकता आहे. राज्यात कुपाषणाची आकडेवारी जाहीर होताच अनेकांची झोप उडाली आहे. त्याला निमित्तही तसेच घडले आहे. कुपोषणाची समस्या म्हटल्यावर प्रत्येकाच्या नजरेसमोर आजवर मेळघाट अथवा आदिवासी पाडे यायचे. अगदी गुगलवर कुपोषण म्हटल्यावर मेळघाट परिसरातीलच फोटो पाहावयास मिळतात. वेळीच कुपोषण समस्येवर तोडगा काढला असता, या समस्येचे गांभीर्य जाणून समस्येचे समूळ निवारण करण्यासाठी प्रयत्न केले गेले असते, तर कदाचित आज या समस्येचा भस्मासूर फोफावणे शक्यच झाले नसते.

राजकीय चर्चा, राजकीय वाद, राजकीय घडामोडी याशिवाय आपले देशातील, राज्यातील, स्थानिक स्वराज्य संस्थामधील समस्यांकडे आपले लक्ष वेधले जात नाही. कुपोषण समस्या आजही मेळघाटापुरती, आदिवासी पाड्यांपुरतीच सीमित राहिली असती, तर कोणी कुपोषणाबाबत फारशी चर्चाही केली नसती, पण आज कुपोषणाच्या समस्येने मेळघाटाचे दरवाजे ओलांडून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत शिरकाव केला आहे. ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागातही या आजाराने आपले अस्तित्व दाखविण्यास सुरुवात केली आहे.

महाराष्ट्राची राजधानी असणारी मुंबई नगरीदेखील कुपोषणाच्या विळख्यात अडकली आहे. राज्यात कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण हे मुंबईत असल्याचे कागदोपत्री उघडकीस आल्यावर अनेकांच्या झोपा उडाल्या आहेत. अर्थात कुपोषणाचा उद्रेक हे आरोग्य यंत्रणेचे अपयश आहे. प्रशासकीय यंत्रणांनी कुपोषणाचे गांभीर्य न जाणल्याने आज कुपोषणाच्या समस्येचा उद्रेक झालेला आहे. कुपोषणाच्या वाढत्या प्रमाणाची कबुली खुद्द विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्य सरकारकडून देण्यात आली आहे.

राज्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके आढळली असून त्यापैकी ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषणाच्या श्रेणीत असून १ लाख ५१ हजार ६४३ बालके मध्यम कुपोषित श्रेणीत असल्याची धक्कादायक माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नांच्या लेखी उत्तरात दिली आहे. राज्यात सर्वाधिक २ हजार ७७८ तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात आढळून आल्याचे तटकरे यांनी उत्तरात नमूद केले आहे. नाशिक जिल्ह्यात ८ हजार ९४४ मध्यम कुपोषित, तर १ हजार ८५२ तीव्र कुपोषित बालके आढळून आली आहेत. धुळे जिल्ह्यात ६ हजार ३७७ मध्यम कुपोषित, तर १ हजार ७४१ बालके तीव्र कुपोषित आहेत.

कुपोषणाची समस्या भारतासारख्या विकसनशील देशाला भूषणावह बाब नसून यावर आता केंद्र सरकार, त्या-त्या राज्य सरकारांना एकत्रितपणे गांभीर्याने विचार करावाच लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बालकांच्या कुपोषणाच्या गंभीर समस्येला देश तोंड देत आहे. देशाची भावी पिढी सशक्त, सुदृढ असणे देशाच्या पुढच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी लहान वयातच मुलांना चांगला सकस व पोषक आहार मिळणे आवश्यक आहे. मात्र गरिबीमुळे लाखो मुलांना आणि मातेलाही पोषक आहार मिळत नसल्याने जन्मतः कुपोषणाची शिकार ठरणाऱ्या बालकांचे प्रमाण मोठे आहे. याबाबतीत नुकतीच माहितीच्या अधिकाराखाली सरकारने दिलेली आकडेवारी धक्कादायक असून, देशात महाराष्ट्रात कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात ३३ लाखांहून अधिक कुपोषित बालके असून, त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक मुले अतिकुपोषित आहेत. महाराष्ट्र, बिहार आणि गुजरात या तीन राज्यांमध्ये कुपोषित बालकांची संख्या सर्वाधिक असून, यात महाराष्ट्र आघाडीवर आहे.

कोरोना या जागतिक महामारीच्या संकटामुळे कुपोषणाची समस्या अधिक गंभीर झाली आहे. सर्व सामाजिक-आर्थिक निर्देशकांवर कोरोना साथीचा नकारात्मक परिणाम झाला आहे. या काळात शाळांमध्ये मिळणारे मध्यान्ह भोजन बंद झाल्याने अनेक गरीब कुटुंबातील बालकांमध्ये कुपोषण वाढले आहे. ही समस्या दूर करण्यासाठी तातडीने पावले उचलणे काळाची गरज आहे. कुपोषणामुळे कोणत्याही आजाराचा संसर्ग होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे बालकांमधील कुपोषणाची समस्या दूर करण्यासाठी गर्भारपणापासून उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्तनपान करणाऱ्या मातांनादेखील पोषक आहार मिळणे आवश्यक आहे.

यासाठी सहा महिन्यांच्या मुलांना व्यवस्थित स्तनपान मिळेल आणि वयाच्या ५ व्या वर्षांपर्यंत त्यांना संतुलित पोषक आहार मिळेल याची सोय करणे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात गर्भधारणेच्या काळात व प्रसूती झाल्यावर मातेच्या पोषणासाठी कोणतेही ठोस धोरण नाही.

अर्थात २००० पासून नवजात आणि लहान मुलांसाठी दुग्धपानाचे (आयवायसीएफ) काम सुरू आहे हे खरे; परंतु त्याला प्रोत्साहन देणे, उदाहरणार्थ पहिल्या सहा महिन्यांत विशेष स्तनपान आणि प्रभावी नर्सिंगची सुविधा उपलब्ध करणे, त्यानंतर स्तनपानाला पर्याय म्हणून बाळाला उपयुक्त हलका घनरूप आहार देणे यासंबंधीच्या लोकव्यवहारांचा अद्याप अभाव आहे.

वस्तुतः सहा महिन्यांपेक्षा अधिक वय असलेल्या बाळाला किती, कोणता आणि कसा आहार द्यावा, हे बाळांची देखभाल करणाऱ्यांना बऱ्याचदा माहीतच नसते. एवढेच नव्हे, तर घन आहार सुरू केल्यानंतरसुद्धा स्तनपान सुरूच ठेवायला हवे. स्तनपानाविषयी अचूक माहिती नसल्याचा परिणाम म्हणून लहान मुलांमध्ये स्थूलता, पोषक घटकांची कमतरता आणि बिगरसंसर्गजन्य आजारांची शक्यता वाढते. पुरेसा आहार न मिळाल्याने मुलांच्या होणाऱ्या नुकसानीबाबत माता-पिता अनभिज्ञ असतात.

राजकीय घटनांना आता दिले जाणारे महत्त्व आता बंद करून लहान मुलांच्या पोषणाकडे गंभीरपणे लक्ष हे द्यावेच लागेल. देशाची भावी पिढी असणारी बालके लहानपणीच कुपोषित असतील, तर देशाचे भविष्य काय असणार आहे? यावर सर्वांनी आताच एकत्रितपणे विचारमंथन करणे आवश्यक आहे. कुपोषित बालकांची समस्या केवळ गरिबांच्या घरातच नाही, तर आता श्रीमतांच्याही घरात पाहावयास मिळत आहे. आहाराबाबत मार्गदर्शन आता महिलांना गर्भधारणा होण्यापूर्वीच होणे आवश्यक आहे. कुपोषणाची वाढती आकडेवारी ही कमी न झाल्यास पुढील वाटचाल भीतिदायी असणार आहे.

# पक्ष- विपक्ष व ठाकरे बंधूंनी भाषेचे राजकारण न करता; मराठीला प्रथम प्राधान्य देवून ज्वलंत व गंभीर प्रश्नाकडे वळावे!

सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढारी मराठी भाषेला प्राधान्य कमी व राजकारणाला जास्त महत्त्व देत असल्याचे राजकीय वर्तुळात दिसून येते.कारण ज्याला जसे वाटेल तसे राजकीय पुढारी वक्तव्य करतांना स्पष्ट दिसत आहे.यामुळे आपल्याला राजकारणात जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.सरकारने अचानक हिंदी सक्तीचा जीआर काढला तेव्हा पासून राज्यात भाषावादाला एक नवीन वळण आल्याचे दिसून आले.सरकारच्या हिंदी सक्तीच्या नादात राज ठाकरे भाजपा पासुन दुरावले व उध्दव ठाकरे यांच्या गोटात जाऊन मिळाले याला कारणीभूत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिक्षण मंत्री भुरे आहेत.आज मराठी-हिंदी भाषा वाद एवढा विकोपाला गेला की शेअर मार्केटमधील केडियोनॉमिक्स कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील केडिया यांनी ट्युटमध्ये म्हटले होते की राज ठाकरे हे लक्षात ठेवा, मी गेल्या ३० वर्षापासून मुंबईत राहत असूनही मला मराठी नीट येत नाही.आता तुमच्या वाईट वागणूकीमुळे मी असा निश्चय केला आहे की मी मराठी शिकणार नाही.मी अशी प्रतिज्ञा करतो.क्या करना है बोल? असे बोलून केडिया ने मराठी भाषेत एक नवीन वाद निर्माण केला व नंतर अंगलट आल्याचे पाहून राज ठाकरेंना माफी सुध्दा मागितली.म्हणजेच ज्या ताटात खायच,त्याच ताटाला छिद्र पाडायचे असे काम केडियाने केले आहे आणि याला कारणीभूत सरकारने काढलेला हिंदी भाषेचा सक्तीचा जीआर आहे.तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी हिंदी सक्तीला नवीन वळण दिले असून गुजरात प्रेम वाढल्याचे दिसून आले. पुण्यातील एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी जय हिंद,जय महाराष्ट्र सोबतच जय गुजरातचाही नारा दिला. कारण त्या कार्यक्रमात अमित शाह उपस्थित होते. यावरून स्पष्ट लक्षात येते मराठी भाषेला विसरून एकनाथराव शिंदे अमित शाह पुढे लोटांगण जात आहे की काय असे वाटत आहे.कार्यक्रम महाराष्ट्रात आणि "गुजरातचा जय जय कार " ही बाब सरकार कशी काय सहन करीत आहे?हा मोठा प्रश्न उपस्थित होतो.कारण एकनाथराव शिंदे एका जबाबदार पदावर विराजमान आहेत.यावरून स्पष्ट होते की राज्यातील काही लोक मुद्दाम मराठी भाषेला डावलून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा प्रयत्न करीत असुन याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत कसा घेता येईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष आहे.शिंदे असेही म्हणायचे की शिवसेना मराठी माणसासाठी उभी केली परंतु आता जय गुजरातच्या नाऱ्यामुळे शिंदेंची मती मारल्या गेली की काय असे वाटते आहे यालाच म्हणतात "विनाशकाले विपरीत बुद्धी".सरकारने व पक्ष-विपक्षांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की भाषेवरून राज्यात कोणत्याही प्रकारची गुंडगिरी व राजकारण नकोच! सर्वांनीच राजकारण बाजूला सारून मराठी भाषेला कसे उंच शिखरावर नेता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.कारण राज्यातील प्रत्येक माणूस मातृभाषेपासून परीपक्व होतो व संपूर्ण विषयांची समज पक्की होते.यामुळे प्रत्येकामध्ये संस्कार, आदानप्रदान, सुसंस्कृतपणा, संस्कृती, जडणघडण, आचारविचार या संपूर्ण बाबी परीपक्व करण्याचे काम संपुर्ण मातृभाषा करीत असते. त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून आले होते.परंतु आता सर्वच राजकीय पक्षांनी भाषेला आपले राजकीय अस्त्र-शस्त्र बनविण्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय खेळी म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती ही बाब राज्याच्या जनतेला अजून पर्यंत समजलीच नाही.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या हृदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे.याचमुळे आज मराठी भाषेवरून पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी आपली राजकीय पोळी शेकण्याचे काम करीत आहेत.राज्य सरकारने कोणाच्या तरी दबावाखाली हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय घेतला तर नाही ना असाही कयास लावला जात आहे.कारण राज्यात पुर्वी त्रिभाषीक पध्दत होती तीच योग्य होती ही बाब आता स्पष्ट दिसून येते. देशातील कोणतेही राज्य असो प्रथम प्राधान्य मातृभाषेलाच हवे. त्यानंतर राष्ट्रीय भाषा आणि त्यांच्या नंतर इंग्रजी किंवा इतर भाषेला प्राधान्य द्यायला हवे.आतापर्यंत मातृभाषा, राष्ट्र भाषा व नंतर इंग्रजी किंवा इतर भाषा असा क्रम पुर्वी पासुनच आहे आणि होता त्याला महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्विकारले आहे. राज्यात हिंदी भाषेचा विरोध मुळातच नाही. आज देशाची उपराजधानी व औद्योगिक राजधानी म्हणून मुंबई ओळख जगभर आहे ही बाब जगजाहीर आहे. परंतु परप्रांतीयांनी मुंबईमध्ये जनुकाय मराठी भाषेवर आक्रमक केले की काय असे वाटत आहे.कारण बॉलीवूड क्षेत्र आणि हायप्रोफाइलमध्ये वावरणारे ९५ टक्के लोक इंग्रजी व हिंदी भाषेचा वापर करतात आणि परप्रांतीय लोक हिंदी भाषेचा वापर करून मराठी भाषेला डावलण्याचा प्रयत्न करतात.यामुळे याचा विपरीत परिणाम मराठी भाषेवर व मराठी माणसावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.यावर प्रामुख्याने ठाकरे बंधूंनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.पुर्वी पहिली ते चौथी पर्यंत हिंदी भाषेची सक्ती नव्हती. हिंदी विषय हा पाचवीपासून सुरू व्हायचा म्हणजेच मातृभाषा परीपक्व झाल्यानंतर हिंदी भाषेचा व इतर भाषेचा विचार केला जात असे.परंतु सरकार राज्यात पहिलीच्या वर्गापासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याचा प्रयत्न करीत होती.परंतु सरकारचा डाव फसला आणि याचा सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला झुकावे लागले व त्रिभाषा धोरणाचे दोन्ही जीआर रद्द करावे लागले.कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल.जर हिंदी पहिल्या वर्गापासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे.ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने व पक्ष-विपक्षांनी आणि ठाकरे बंधूंनी लक्षात ठेवली पाहिजे.आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही.कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे तेच अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल करूच नये.सरकार,पक्ष-विपक्ष व ठाकरे बंधू यांनी भाषा वादाला ताबडतोब पुर्णविराम लावावा व पुर्वी ज्या पद्धतीने भाषेचे समिकरण होते त्याच पद्धतीने पुढे सुरू ठेवावेत.सध्या पावसाळा सुरू आहे व पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात रौद्र रूप धारण केले आहे यामुळे शेतकरी, गरीब व सर्वसामान्य अडचणीत सापडला असून कठीण परिस्थितीत आहे अशा ज्वलंत प्रश्नावर सरकार,पक्ष-विपक्ष व ठाकरे बंधूंनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.कारण मराठी माणसाला मराठी भाषेवर प्रेम आहे राजकारणावर नाही.जय महाराष्ट्र!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

# काबऱ्या खडक धरणाचे दुरुस्तीचे काम ८० टक्के पूर्ण
## ५-६ वर्षानंतर धरणात ७० टक्के पाणीसाठा
## आमदार सौ मंजुळाताई गावित यांनी केले जल पूजन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

साक्री तालुक्यातील जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला काबरा खडक धरणाचे दुरुस्तीचे काम जवळपास ८० टक्के पूर्ण झालेले असून गेल्या पाच सहा वर्षानंतर ७० टक्के पाणीसाठा झालेला आहे. आषाढी एकादशीचे अवचित साधून आमळी येथील श्री कन्हैयालाल महाराजांच्या पूजा व काकड आरती नंतर आमदार मंजुळाताई गावित यांनी का बरं खडक धरणास शिवसेनेचे पदाधिकारी व परिसरातील ग्रामस्थांच्या उपस्थितीत भेट देऊन साडीचा आहेर अर्पण करत जलपूजन केले.



यावेळी आमदार मंजुळाताई गावित यांनी सांगितले की २०२०-२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे काबरा खडक धरणात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला होता. धरण फुटण्याची भीती झाली होती. त्यामुळे तत्कालीन प्रशासनाने धरणाचा सांडवा तोडला त्यानंतर या धरणाच्या दुरुस्तीकडे प्रशासनाने कुठल्याही प्रकारचे लक्ष दिले नाही. आमदार ताई म्हणाल्या की मी आमदार झाल्यानंतर या धरणाच्या दुरुस्तीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. मार्च २०२१ मध्ये २ कोटी ६ लक्ष रुपयाचे अंदाजपत्रक शासनाकडे पाठविण्यात आले. प्रत्यक्ष पाहणीनंतर त्यात त्रुटी निघाल्याने एप्रिल २०२२ मध्ये ४ कोटी ८८ लक्ष रुपयाच्या सुधारित अंदाजपत्रक मंजुरी मिळवून घेतली. मार्च २३ २४ या अर्थसंकल्पात विशेष बाब म्हणून ५ कोटी रुपयाचा निधी मंजूर करून घेतला.

# धुळे शहर व पांझरा नदी तीरावरील नागरिकांना सतर्कतेचे आवाहन : कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, धुळे

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



पांझरा मध्यम प्रकल्प लाटीपाडा पिंपळनेर तालुका साक्री क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे धरण क्षेत्रामध्ये पाण्याचा येवा मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे पांझरा नदीच्या दोन्ही तीरावरील नागरिकांना कळवण्यात येते की पांझरा मध्यम प्रकल्प आज दि ७ जुलै २०२५ रोजी १०० एवढा भरला असून पुढील काही तासांत विसर्ग वाढवला जाण्याची शक्यता आहे,

तरी नदी काठच्या नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असे आवाहन कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग,धुळे व उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग,साक्री तसेच शाखा अधिकारी, पाटशाखा, पिंपळनेर यांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे. त्याचबरोबर पांझरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे तसेच अक्कलपाडा प्रकल्पाच्या वरील बाजूस असणाऱ्या पांझरा, मालनगाव आणि जामखेडी प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने अक्कलपाडा धरणामध्ये पाण्याचा येवा वाढत आहे. त्या अनुषंगाने पांझरा नदीच्या दोन्ही तीरावरील तसेच धुळे शहरातील नागरिकांना कळवण्यात येते की निम्नपांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्पातून दि. ०७ जुलै २०२५ रोजी पहाटे पासून विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवून ५२३० क्युसेक पाणी सोडण्यात येत असून पाण्याची आवक वाढल्यास पूर्वसूचनेने विसर्ग वाढविण्यात येणार आहे.

तरी पांझरा नदी काठच्या नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असे आवाहन कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग, धुळे व उपविभागीय अधिकारी, अक्कलपाडा प्रकल्प उपविभाग, अक्कलपाडा यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# प्रणेता देसले यांचे सामाजिक कार्य अतुल्य खासदार सुनील तटकरे, रुपाली चाकणकर यांच्याकडून कौतुक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------





दहिवेल येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा छत्रपती शिवाजी महाराज विचार मंचचे अध्यक्ष प्रणेता देसले यांनी खासदार सुनील तटकरे व रुपाली चाकणकर यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर सामाजिक कार्याचा आढावा दिला त्यावर खासदार सुनील तटकरे व महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी प्रणेता देसले यांचे सामाजिक कार्य अतुल्य आहे असे उदगार काढले. सामाजिक कार्यकर्ते प्रणेता देसले यांनी आदिवासी व ग्रामिण भागामध्ये अनेक विधायक उपक्रम राबवीलेले आहेत. सदर उपक्रमांमुळे ग्रामिण भागातील युवक, युवती, शेतकरी बंधू, व्यवसायीक बंधु तसेच परिसरातील नागरीकांसाठी मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधनासाठी उपयोगी पडलेले आहेत. प्रणेता देसले यांनी गेल्या अनेक वर्षापासुन पर्यावरण संतुलन, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, वनमोहोत्स्व, वन्यप्राणी सप्ताह, वृक्ष दिंडी, पाणी आडवा पाणी जिरवा, उपक्रम, जलसंवर्धनासाठी वनराई बंधारे बांधाण्या साठी जनजागृतीपर उपक्रम तसेच अंधश्रध्दा निमुर्लन, बाल मजूरी विरोधी जनजागृती, कृष्ट्ररोग जनजागृती, एड्स जनजागृती, दिव्यांग कल्याण जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, प्रौढ शिक्षण जनजागृती, आपत्ती व्यवस्थापन जनजागृती, ग्राहक जनजागृती , फटाके मुक्त दिवाळी, उर्जा संवर्धन व व्यवस्थापन जनजागृती, तंटा मुक्ती गाव मोहिम जनजागृती, स्वच्छता अभियान, बेटी बचाव बेटी पढाव अभियान, युवक कल्याण, महिला सक्षमीकरण, पर्यावरणपूरक होळी, रस्ता सुरक्षा अभियान, पुस्तक वाटप अभियान, डिजिटल इंडिया जनजागृती, बालकांची काळजी व सुरक्षा जनजागृती, कुपोषण जनजागृती, साक्षरता अभियान इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रम गेल्या २० वर्षापासुन ग्रामिण भागामध्ये राबवीत आहेत. प्रणेता देसले यांना त्यांच्या या कार्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने, विविध नामांकित सामाजिक संस्थांच्या वतीने अनेक पुरस्कार व सन्मानपत्र मिळालेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख थांबावा यासाठी प्रणेता देसले यांच्या वतीने गेल्या एक ते दीड वर्षापासुन महाराष्ट्रभर शिवाजी पुतळा नव्हे शिवतिर्थ म्हणूया हा उल्लेखनीय उपक्रम राबवीण्यात येत आहे. या उपक्रमात महाराष्ट्रातील आमदार, खासदार, अभिनेते, शेतकरी, व्यवसायईक, युवावर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ मंडळी सहभागी झालेली आहेत व भरभरुन प्रतिसाद दिलेला आहे. छत्रपती संभाजीराजे भोसले, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी प्रणेता देसलेंच्या उपक्रमाचे कौतुक केलेले आहे. तसेच प्रणेता देसले यांना मलेशियाच्या वाबा या संस्थेतर्फे देखील सन्मानित करण्यात आले आहे. तसेच प्रणेता देसले यांनी मुक्तपत्रकारितेच्या माध्यमातून नामांकित वृत्तपत्रातून लेख प्रकाशित केले आहेत. समाजसेवक प्रणेता देसले हे जवळपास दोन दशकांपासून सामाजिक कार्यात सहभागी आहेत.

# घोटी ग्रामपंचायतच्या दोन सदस्यांवर बनावट कागदपत्र प्रकरणी गुन्हा दाखल हॉटेलसाठी बनावट 'ना हरकत प्रमाणपत्र' तयार केल्याचा आरोप

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------------

गोरेगाव तालुक्यातील घोटी ग्रामपंचायतीतील दोन सदस्यांनी बनावट शिक्का, सील व स्वाक्षरीद्वारे 'ना हरकत प्रमाणपत्र' तयार करून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गोरेगाव पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला असून, प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

घोटी येथील हॉटेल ब्लू इन हाऊसचे मालक प्रियंका भूपेश नंदेश्वर यांनी हॉटेलसाठी ग्रामपंचायतीकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' मागितले होते. मात्र, ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र रहांगडाले आणि मनोज बिसेन यांनी सरपंच व ग्रामसेवकाच्या नावाने बनावट सील, शिक्क्यांचा वापर करून खोटे प्रमाणपत्र तयार केले. इतकेच नव्हे तर त्यांनी बनावट स्वाक्षरी, मासिक ठरावाची खोटी प्रत व सात-ब नोंदणीची बनावट पावती देखील तयार करून संबंधित हॉटेलमालकाला प्रदान केली.

या गैरप्रकाराची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपी सदस्यांविरोधात फसवणूक, खोटे कागदपत्र तयार करणे आणि सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करण्याच्या कलमांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गोरेगाव पोलिस स्टेशनचे अधिकारी करत आहेत.

# पिंपळनेर पोलीस स्टेशनचा दर्जा वाढविण्याची, न्यायालय स्थापन करण्याची आमदार मंजुळाताई गावित यांची विधानसभेत मागणी

श्री. संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------




साक्री मतदारसंघातील पिंपळनेर पोलीस स्टेशनचा दर्जा वाढवून पोलीस निरीक्षक पदाची निर्मिती करावी, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासी वसाहतीची दुरुस्ती करावी व पिंपळनेर येथे स्वतंत्र न्यायालयाची निर्मिती करावी, अशी मागणी आमदार सौ. मंजुळाताई गावित यांनी सोमवारी, दिनांक ७ जुलै २०२५ रोजी विधानसभेत गृह विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान केली.

आमदार गावित यांनी विधानसभेत बोलताना सांगितले की, " साक्री मतदारसंघातील पिंपळनेर पोलीस स्टेशन अत्यंत महत्वाचे असून, त्याच्या कार्यक्षेत्रात दोन राष्ट्रीय महामार्ग आहेत – नंदुरबार-सूरत व नाशिक-नागपूर. पिंपळनेर ही मोठी बाजारपेठ असून अप्पर तहसीलदार यांचे कार्यालय येथे कार्यरत आहे. तालुका निर्मितीच्या दृष्टिकोनातूनही पिंपळनेर अग्रस्थानी आहे."

त्याचबरोबर त्यांनी राईनपाडा सारख्या गावात घडलेल्या हत्याकांडाचा उल्लेख करत, या भागातील वाढती गुन्हेगारी, गुंडगिरी, राजकीय मोर्चे आणि आंदोलने यावर वेळेत नियंत्रण ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलिसांची गरज आहे, असे नमूद केले. त्यामुळेच पिंपळनेर पोलीस स्टेशनचा दर्जा वाढवून पोलीस निरीक्षक पद देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांसाठीची निवासी वसाहत ही पूर्णतः मोडकळीस आलेली असून, ती दुरुस्त करणे अथवा नवीन निवासी इमारती उभारणे गरजेचे झाले आहे. यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी, अशी विनंतीही आमदार गावित यांनी केली.

शेवटी, पिंपळनेर येथे स्वतंत्र न्यायालयाची निर्मिती करण्यात यावी, ही मागणीही त्यांनी अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणून दिली.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७०

# पांझरा धरण ओसंडले; जलपूजन सोहळा उत्साहात, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## पिंपळनेर परिसरात मुसळधार पावसामुळे पांझरा नदीला पूर; सामाजिक कार्यकर्त्यांचा जलपूजन सोहळा तर अप्पर तहसीलदारांनी दिला सुरक्षिततेचा सल्ला

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------------



पिंपळनेर पश्चिम पट्ट्यात संततधार पावसामुळे पांझरा नदीला मोठा पूर आला. लाटीपाडा धरण पूर्ण क्षमतेने भरून ओसंडू लागले त्यामुळे पिंपळनेर शहरासह परिसरातील जनतेचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला असून शेतकऱ्यांनाही या पावसामुळे मोठा फायदा झालाय. आज पिंपळनेर शहरातील सामाजिक कार्यकर्ते माजी सरपंच योगेश नेरकर यांच्या हस्ते पांझरा नदीला साडी चोळीचा आहेर देऊन जलपूजन करण्यात आले यावेळी माजी सभापती संजय ठाकरे, माजी उपसरपंच प्रताप मराठे,सौ. सुवर्णा आजगे, सतीश पाटील, जे टी नगरकर , भाजप अध्यक्ष डॉ.राजेंद्र पगारे, देवेंद्र कोठावदे, मा.प.स.सदस्य देवेंद्र पाटील, सुभाष नेरकर, निलेश कोठावदे, नितीन कोतकर, प्रतिक कोतकर, प्रमोद गांगुर्डे, सुभाष जगताप,शाम दुसाने, डॉ .बाबा बागुल गजेंद्र कोतकर, किशोर चौधरी, रामकृष्ण सोनवणे,प्रकाश आहीरराव,अमोल पाटील, प्रशांत जगताप यांच्यासह गावातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अप्पर तहसीलदार दत्तात्रय शेजुळ यांनी पांझरा नदी, जामखेली नदी, कान नदी, तसेच गठखळ नदीला पूर आल्याने नदी काठावरील जे निवासी अथवा जनावरांचा गाय गोठा असेल तर नागरिकांनी त्वरित सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे कारण पिंपळनेर पश्चिम पट्ट्यात संततधार पाऊस सुरू असल्याने पूर्ण नियंत्रण कक्षाच्या बाहेर जाऊ शकतो त्यामुळे कोणतेही जीवित हानी होऊ नये किंवा आर्थिक हानी होऊ नये म्हणून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# गैरहजर शिक्षक, कुलूपबंद शाळा आणि अधिकारी गप्प – विकासासाठी तातडीची कारवाई गरजेची!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------







जिल्हा परिषद शाळा वैताकवाडी येथे गेल्या दीड वर्षांपासून शिक्षक कर्मचारी कायमस्वरूपी गैरहजर आहेत. शाळेला कायम कुलूप असते, त्यामुळे तेथील आदिवासी व दलित विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्णपणे थांबले असून, शासनाच्या शिक्षण हक्काचा थेट उल्लंघन केला जात आहे. शिक्षण अधिकाऱ्यांसह गटविकास अधिकाऱ्यांनी याकडे सातत्याने दुर्लक्ष केले असून, केवळ तक्रारदारांचा दबाव आल्यानंतर शिक्षकाची तात्पुरती बदली करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे.

तक्रारदार कैलास भदाणे, पत्रकार अक्षय पानपाटील आणि धनराज पानपाटील यांनी वेळोवेळी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उलट तक्रार मागे घेण्यासाठी धमक्या, दमदाटी आणि राजकीय दबाव टाकण्यात येत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

शाळेतील प्रत्यक्ष परिस्थिती भयावह – पत्रकारांच्या भेटीत धुळीत पडलेले थोर नेत्यांचे फोटो, मोडकळीस आलेला वर्गद्वार आणि बंद शाळा दिसून आली.

मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्याकडे या प्रकाराची तक्रार सादर करण्यात आली असून, दोषी शिक्षकासह पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने निलंबनाची कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

पाच दिवसात कार्यवाही न झाल्यास तक्रारदारांनी पावसाळी अधिवेशनात विधान भवन मुंबई येथे आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

# धुळेची कन्या सारा बेहेरे हिला राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे यश

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------




छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत धुळेची सुकन्या सारा सागर बेहेरे हिने जबरदस्त कामगिरी करत महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

धुळे येथील एस. व्ही. के. एम. विद्यालयात शिक्षण घेत असलेली सारा ही १२ वर्षांखालील वयोगटात सहभागी झाली होती. साऱ्या राज्यातून आलेल्या खेळाडूंमध्ये आपल्या अफलातून स्केटिंग कौशल्याच्या जोरावर तिने यशाचे शिखर गाठले.

या यशामागे तिची सातत्यपूर्ण मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे पाठबळ हे घटक कारणीभूत ठरले आहेत. प्रिन्स रोलर स्केटिंग अकॅडमी, धुळे येथील प्रशिक्षण घेतलेल्या साराला राज्यस्तरीय कोच श्री. धनंजय व्ही. पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

साराच्या या यशामुळे धुळे जिल्ह्याचे नाव राज्यभर उजळले असून भविष्यात ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आपली चमकदार कामगिरी नोंदवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दैनिक स्वराज्यदूत बातमीची घेतली तात्काळ दखल. शेतकऱ्यांच्या विविध मागण्या तात्काळ मंजुरी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------




भाजपा किसान मोर्चा शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घेतली भेट; शेतकऱ्यांच्या विविध अडचणीवर झाली चर्चा.


श्री बिंदू शेठ शर्मा यांनी महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदनाद्वारे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्न सोडवण्याची काही दिवसापूर्वी मागणी केली होती. त्या मागणीची मंत्री बावनकुळे यांनी तात्काळ दखल घेतली. शेतकऱ्यांना बिगर बोजा पिक कर्ज दोन लाख रुपये पहिली मुदत एक लाख रुपये साठ हजार होती आत्ताची पीक कर्जाची मर्यादा तीन लाखा वरून पाच लाख केली, तसेच बेघर बांधकाम करणाऱ्यांना घरकुल योजनेसाठी पाच ब्रास वाळू मोफत देण्यात येईल तसेच कुठल्याही स्वयंघोषणा पत्रासाठी स्टॅम्प पेपरची गरज नाही असे जनहिताचे निर्णय श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतल्याबद्दल सर्व शेतकरी वर्गातून अभिनंदन करण्यात आले. तसेच श्री बिंदू शेठ शर्मा यांच्या शेतकऱ्यांविषयीच्या विविध मागण्यांना मान्यता देऊन तात्काळ अंमलबजावणी केली त्याबद्दल बिंदू शेठ शर्मा यांनी मनापासून आभार मानले. तसेच भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेशाध्यक्ष महामंत्री श्री बिंदू शेठ शर्मा यांच्या पाठपुराव्याला यश आले व श्री बावनकुळे साहेबांनी तात्काळ अंमलबजावणी केली.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# "समाजसेवा हीच ईश्वरसेवा" – वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------



गोरेगाव तालुक्यातील चिल्हाटी गावात समाजसेवेच्या वृत्तीने प्रेरित होत दरवर्षीप्रमाणे यंदाही बादल टेभंरे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा चिल्हाटी येथे विद्यार्थ्यांना वह्या व रजिस्टरचे वाटप केले.

"एक हात मदतीचा" या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत, विद्यार्थ्यांशी संवाद साधत वाढदिवस साजरा करण्याची ही परंपरा ते गेल्या अनेक वर्षांपासून पाळत आहेत. शिक्षणात मदतीचा हात देण्याचा त्यांच्या मनोभावातूनच हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या प्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी तसेच बादल टेभंरे यांचे जिवलग मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व शिक्षणाविषयी सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले.

" तुम्ही वाढदिवसाला केक कापा, पार्टी करा, पण अशा प्रकारचा समाज उपयोगी प्रयोग एकदा नक्की करून पाहा, नक्कीच समाधानाची अनुभूती मिळेल", असा संदेश बादल टेभंरे यांनी दिला.

आपण दाखवलेले प्रेम, पाठिंबा व प्रेरणा यामुळे माझ्या सामाजिक कार्याची ऊर्जा अधिकच वाढली आहे, असे ते यावेळी म्हणाले.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज गिरणा धरण ते नांदगाव पाणीपुरवठा योजना सहा महिन्यात पुर्ण होणार

## आ. सुहास कांदे यांच्या अध्यक्षतेखाली संबधीत अधिकाऱ्याचीं मुंबई येथे बैठक संपन्न

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज गिरणाधरण ते नांदगाव पाणी योजना शहराला शुद्ध व सातत्यपूर्ण पाणीपुरवठा करण्यासाठी गिरणा नांदगाव पाणी योजना राबवण्यात येत आहे. या वेळी ठेकेदारांनी माहिती दिली की, ही योजना साधारणपणे पुढील ६ महिन्यांत पूर्ण केली जाईल. आ.सुहास कांदे यांनी यावेळी कामाच्या दर्जावर आणि वेळेच्या काटेकोर अंमलबजावणीवर विशेष भर देत, "नांदगावकरांना दर्जेदार पाणी देणे ही माझी सर्वोच्च प्राथमिकता आहे. कोणत्याही अडथळ्यामुळे नागरिकांचे हक्क डावलले जाणार नाहीत," असे ठामपणे सांगितले एकत्रित ध्येय आणि संकल्प या आढावा बैठकीत तांत्रिक बाबी, निधी व्यवस्थापन, अंमलबजावणीची अडचणी, तसेच पुढील टप्प्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना कामात गती आणण्यासाठी आणि नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक ती पावले त्वरित उचलण्याचे निर्देश देण्यात आले. या योजनांमुळे हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, दीर्घकाळ चालत आलेली पाण्याची समस्या कायमची दूर होणार आहे. बैठकी दरम्यान आ.सुहास कांदे यांनी सांगितले, "ही केवळ विकास योजना नाहीत, तर माझ्या मतदारसंघातील जनतेच्या आयुष्याचा भाग आहेत. पाणी ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे आणि ही गरज पूर्ण करणे, हे माझे पहिले कर्तव्य आहे."

या बैठकीत उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी आणि ठेकेदारांनी आपली जबाबदारीची जाणीव व्यक्त करत, काम वेळेत आणि योग्य दर्जाने पूर्ण करण्याचे ठोस आश्वासन दिले. योजनेच्या प्रत्येक टप्प्याचा नियमित आढावा घेण्यात येणार असून, नागरिकांना वेळोवेळी माहिती पुरविण्याची व्यवस्था केली जाणार आहे. या बैठक प्रसंगी अंजुमताई कांदे, युवासेना जिल्हाप्रमुख फरहान दादा खान, ठेकेदार श्री. अविनाश शिरसाठ, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट (पीएमसी) कचवे, तसेच नांदगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. शामकांत जाधव उपस्थित होते.

प्रणव क्लासेस
Play Group | Nursery | Jr. KG | Sr. KG
इ. १ ली ते १० वी सर्व विषय
इ. ११ वी / १२ वी कॉमर्स व सायन्स
इंग्रजी/सेमी इंग्रजी/मराठी माध्यम
CBSE / ICSE / SSC Board
३६, निरामय संकुल रो-हाऊस, अंबड वजन काट्याजवळ, अंबड, नाशिक-१०
Mo. 7066379386, 7796704369

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# आदर्श कॉलनीत जीवघेणं संकट!

## साप- विंचवांचा कहर, नगर परिषदेच्या दुर्लक्षाने नागरिकांचे जीव धोक्यात – आंदोलनाची चेतावणी

## दीड-दोन वर्षांपासून रस्त्याचा मलमा न हटवल्याने नागरिक संतप्त, प्रशासनाला थेट इशारा

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------------







शहरातील रिंग रोडलगत जिल्हा क्रीडा संकुलाच्या मागे, मराठा समाज भवनासमोर असलेल्या आदर्श कॉलनीतील नागरिक सध्या भीतीच्या छायेत जीवन जगत आहेत. कारण, दीड ते दोन वर्षांपूर्वी सिमेंट रस्त्याचे काम सुरू असताना जुन्या रस्त्याचा मलबा थेट रहिवासी प्लॉटवर टाकण्यात आला आणि तो आजपर्यंत न हटवता तसाच ठेवण्यात आला आहे.

त्या मलमामुळे साप, विंचू, नेवळ, घाणजंतू वाढले असून शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. कॉलनीशेजारी असलेल्या बी. पी. पब्लिक शाळेतील मुलांमध्येही दहशत पसरली आहे.

संतप्त नागरिकांचा सवाल — "पैसे खाल्ले का?"

काम करणाऱ्या ठेकेदाराने व अभियंत्याने मलमा हटवण्याचे तोंडी आश्वासन दिलं होतं. पण दीड वर्ष उलटलं तरी मलबा जागेवरच!

नागरिकांचा थेट आरोप – "जर बिल काढलं गेलं असेल, तर मलबा काढला का नाही?"

"जर बिल नाही काढलं, तर पैसे कोणाच्या खिशात गेले?"

" नगर परिषदेचे अभियंता, ठेकेदार व अधिकाऱ्यांची मिलीभगत आहे का?"

संतप्त नागरिकांची प्रतिक्रिया :

**सुनील कुंभलवार** – "आता सहनशक्तीचा अंत झाला आहे, जर मलमा दोन दिवसात हटवला नाही, तर रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय नाही."

**राजा यादव** – "मुलं शाळेत जाताना घाबरत आहेत, आणि नगर परिषद शांत झोपली आहे."

**सवियानंद शामकुंवर** – "हजार वेळा तक्रार केली, फक्त खोटी आश्वासने मिळाली!"

**तेजेश्वर पटले** – "रात्री साप घरात घुसतोय, याची जबाबदारी कोण घेणार?"

**सचिन सिंग बैंस** – "आता कारवाई झाली नाही, तर आंदोलन अटळ आहे!"

अशोक भालाधरे, मुकेश ताडेकर, लिलेश्वर बहेकार, रमेश शिवनकर, डॉ. बिसेन व अन्य नागरिकांनीही तीव्र संताप व्यक्त केला.

प्रशासनाचे मौन – लाजिरवाणं!

झलके मॅडम (प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद) – "दोन दिवसांत मलबा हटवू" असा शब्द दिला, पण अजून काहीच नाही!

डिप्टी इंजिनिअर जाधव – कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार!

अभियंता देशमुख – "लवकरच हटवू" एवढंच उत्तर – पण 'लवकर' केव्हा?

आदर्श कॉलनी वासियांचा अंतिम इशारा:

"आता पुरे झालं!

तीन दिवसांत मलबा हटवला नाही, तर आमचा आवाज रस्त्यावरून उठेल – प्रशासन जबाबदार असेल!"

# आणीबाणीत कारावास भोगलेल्या नांदगावच्या दत्तात्तय गुप्ता यांचा छत्रपती संभाजीनगर येथे सत्कार

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------




२५ जून १९७५ रोजी देशातील ततकालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अघोषीत आणीबाणी लागू करून. एक प्रकारे लोकतंत्रा ची हत्या केली. या अघोतीत आणिबाणी च्या विरोधात त्या वेळेस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने लढा पुकारला. या आणिबाणी च्या विरोधात लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख समाज सेवकांनी देशासाठी पुढे येऊन या काळ्या घटनेचा विरोध करूण आणिबाणी चा विरोध केला. त्याच्या सोबत देशातील लाखो देशभक्तानीं आणीबाणी च्या विरोधात एकत्रीत येऊन लढा दिला. या वेळी हजारो देशभक्त जेल मधे गेले. काही देश भक्तांना २१ महिने '१८ महिने '१२ महिने '६ महिने '३१ दिवस अशा प्रकारे जेल मधे ठेवण्यात आले. हजोरो देश भक्त जेल मध्ये गले. परंतु लाखो देश भक्तीनी हा सुरूच ठेवला .लढा सुरू असल्याने इंदिरा गांधी यांनी २१ मार्च १९७७ ला आणिबाणी मागे घेण्याची घोषना करून सर्व लोकतंत्र सेनानी ना सोडून दिले. भारत भर जल्लोश सुरु झाला. झालेल्या घटनेस आज ५० वर्षे पूर्ण झाली. या निमित्य आणीबाणी कारावास भोगलेल्या व्यक्तीना अपरजिल्हाधिकारी श्री.अडकूने यांच्या हस्ते जिल्हा प्रशासनाच्या वतीने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी सभागृहात सकाळी हा कार्यक्रम संपन्न झाला. संभाजी अडकूने(अपरजिल्हाधिकारी), संगीता राठोड(उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन), सुचिता शिंदे(उपजिल्हाधिकारी भूसंपादन), एकनाथ बंगाले(उपजिल्हाधिकारी जायकवाडी प्रकल्प), लोकतंत्र सेनानी संघाचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य श्री राजेन्द्र मधुकरजी गुप्ता होते. सन्मानपत्र वितरनाचा सोहळा भव्य दिव्य संपन्न झाला. आणीबाणी त कारावास भोगलेल्या व्यक्ती आणि त्यांचे वारस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक महापालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारात 'कट': मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश!

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------




नाशिक महानगरपालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारातून कंत्राटदार पैसे काढून घेत असल्याचा गंभीर आरोप आज विधानसभेत करण्यात आला. आमदार देवयानी फरांदे यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. गरिबांच्या श्रमावर डल्ला मारणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

आमदार देवयानी फरांदे यांनी विधानसभेत प्रश्न विचारला की, "नाशिक महापालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या पैशांतून कंत्राटदार पैसे काढून घेत आहेत. काही अधिकारी आणि कंत्राटदार संगनमत करून त्यांच्या पगारातून पैसे घेत आहेत. गरिबांच्या पगारातून पैसे काढण्याचं हे प्रमाण खूप जास्त आहे. यावर सरकार काय आणि कधी कारवाई करणार?"

या गंभीर आरोपावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ लक्ष घालणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, "नाशिक महापालिकेशी संबंधित या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकारी चौकशी करतील. यात जे दोषी आढळतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल आणि संबंधित कंपनीला ब्लॅकलिस्ट केले जाईल."

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, " कंत्राटदार पैसे देत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या थेट खात्यात पैसे जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता यापुढे कामगार विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाईल. कामगारांना दिलेले पैसे जर कोणी घेतले, तर तो फौजदारी गुन्हा मानला जाईल. तसेच, सात-आठ वर्षे पीएफ न भरणाऱ्या कंत्राटदारांनाही काळ्या यादीत टाकले जाईल."

या घोषणेमुळे नाशिक महापालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे, तर गैरव्यवहार करणाऱ्यांवर आता कठोर कारवाईचा बडगा उगारला जाईल, हे स्पष्ट झाले आहे.